


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १६० वा बुधवार दि. ०६ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अमेरिकेचा भारतावर पुन्हा टॅरिफ बॉम्ब; रशियन तेल खरेदीनं संतापलेल्या ट्रम्प यांची मोठी घोषणा

**वृत्तसंस्था/ परभणी**

वॉशिंग्टन डीसी: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारत ावर टॅरिफ बॉम्ब टाकला आहे. बुधवारी संध्याकाळी त्यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादत असल्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. भारत रशियाकडून सातत्यानं खनिज तेलाची खरेदी करत असल्यानं अतिरिक्त टॅरिफ लावण्यात येत असल्याचं अमेरिकेकडून सांगण्यात आलं आहे. यामुळे आता अमेरिकेकडून भारतावर लावण्यात आलेलं एकूण टॅरिफ ५० टक्क्यांवर पोहोचलं आहे. याआधी अमेरिकेनं भारतावर २५ टक्के टॅरिफ आणि दंडाची घोषणा केली होती. रशियाकडून भारत करत असलेली तेल खरेदी हे यामागचं कारण असल्याचं ट्रम्प यांच्याकडून सांगण्यात आलं होतं. ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या आदेशानुसार, नवीन टॅरिफ दर २१ दिवसांत लागू होतील. याचा अर्थ २७ ऑगस्ट २०२५ पासून भारताकडून अमेरिकेला निर्यात होणाऱ्या सामानांवर, वस्तूंवर ५० टक्के लावण्यात येईल. ज्या वस्तू, सामान या तारखेच्या आधी अमेरिकेला पाठवल्या जातील आणि १७ सप्टेंबर २०२५ च्या आधी अमेरिकेत पोहोचतील, त्यांना यातून सवलत मिळेल. टॅरिफ अन्य शुल्क आणि करांच्या अतिरिक्त असेल. काही विशेष प्रकरणांत यात सूट असेल, असं आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेलं आहे. एखादा अन्य देश रशियाकडून थेट किंवा अप्रत्यक्षपणे खनिज तेलाची आयात करत असेल तर त्यांच्यावरही अशाच प्रकारची कारवाई करण्यात येईल, असा थेट इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.



रशिया किंवा अन्य कोणता देश अमेरिकेच्या धोरणांनुसार पावलं उचलत असल्यास टॅरिफमध्ये बदल केला जाऊ शकतो, असं ट्रम्प प्रशासनाकडून सांगण्यात आलेलं आहे.

# क्रांतिकारी सह चांडोळ वासियांनी घरकुल लाभार्थ्यांसाठी दिला उपोषणाचा इशारा.....

**जनसंचलन/ चांडोळ**

चांडोळ येथील गेल्या तीस ते चाळीस वर्षांपासून घरकुल योजनेपासून वंचित असलेल्या चांडोळ गावातील गरीब व गरजू नागरिकांनी आता संघर्षाची भूमिका घेतली आहे. गावातील क्रांतिकारी विचारांचे तरुण व ज्येष्ठ नागरिक एकत्र येत प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात आवाज उठवत आहेत. शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ मिळावा, यासाठी त्यांनी उपोषणाचा इशारा दिला असून, यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. चांडोळ गावात अनेक कुटुंबे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत कच्या झोपड्यांत, पावसात गळती होणाऱ्या छपराखाली राहत आहेत. काही कुटुंबांकडे तर स्वतःची जागा देखील नाही. शासनाकडून वारंवार आश्वासने मिळूनही अद्यापपर्यंत प्रत्यक्षात कोणताही लाभ मिळालेला नाही, ही बाब अत्यंत खेदजनक असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गेल्या तीस ते चाळीस वर्षांपासून इ क्लास जागेत काही कुटुंब राहत असून नियमित पने ग्रामपंचायत चा कर (पाणीपट्टी आणि घरपट्टी) ते भरत आहे परंतु शासनाच्या जाचक अटीमुळे त्यांना गरजू असताना सुद्धा घरकुल योजनेचा लाभ घेता येत नाही निवेदनात ग्रामस्थांनी सुचवले आहे की गावातील शासकीय मालकीच्या काही ई-क्लास जागा रिकाम्या असून, त्या जागेवर शासनाने गरजू लाभार्थ्यांसाठी घरे उभारावी. ही जागा स्थानिक प्रशासनाच्या अखत्यारीत असून, तातडीने कारवाई केल्यास अनेक कुटुंबांना कायमस्वरूपी निवारा मिळू शकतो. गरिबांचे हक्काचे घर ही केवळ घोषणा न राहता, ती प्रत्यक्ष कृतीत उतरली पाहिजे. अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू,फ्फ़असा इशारा क्रांतिकारी चे अमोल मोरे सह चांडोळ वासियांनी दिला आहे. चांडोळ वासियानी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन यासंदर्भात लेखी निवेदन सादर केले आहे. यामध्ये त्यांनी घरकुल मंजुरी, ई-क्लास जागेचा वापर, तसेच लाभार्थ्यांची पात्रता सूची तातडीने जाहीर करण्याची मागणी केली आहे. ङ्गङ्गजर लवकरात लवकर आमच्या मागण्या मान्य न झाल्यास, चांडोळ येथील लाभार्थी , जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण




करण्यात येईल,फ्फ़ असा ठाम इशारा या निवेदनात दिला आहे. यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अमोल मोरे आणि मोठ्या संख्येने चांडोळ चे लाभार्थी उपस्थित होते .

# मधुमास...

## संपादकीय लेख

नववर्षाचा प्रथम दिवस उत्साहाने साजरा करण्याची परंपरा समाजातल्या सर्व थरामध्ये रुजली आणि भिनली आहे. यामागचं कारण म्हणजे आयुष्य सुखी आणि समृद्ध करण्यासाठी प्रत्येकाला स्थैर्य हवं असतं. मात्र त्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा यांची नितांत गरज भासते. अर्थार्जन करून अन्न आणि वस्त्रांची गरज तर भागते मात्र या अर्थार्जनापोटी अपार कष्ट भोगल्यावर आपल्या थकलेल्या देहाला निवांतपण लाभावं याकरिता उत्तम निवाऱ्याची आवश्यकता असते. पूर्वी अश्मयुगात मानव दगडांची हत्यारं वापरत असे आणि निवाऱ्याच्या योगाने गुहेमध्ये राहत असे. मात्र नैसर्गिक स्थित्यंतर लक्षात घेता मानवाला प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमध्ये टिकून राहिल असा निवारा शोधणं क्रमप्राप्त झालं. पुढे स्वतः मधल्या मानसिक, वैचारिक आणि शारीरिक क्षमतेचा अंदाज आल्यावर मानवाने निसर्गनिर्मित गुहेमध्ये न राहता स्वतःसाठी घर बनवलं. पुढे जसजशी गरज भासत गेली तसतसे त्याचे घर परिपूर्ण होत गेले. सुखसोयींनं सज्ज झालं. त्यानंतर मानव वसाहती करून त्यात रमू लागला. यातूनच काही मनाजोगतं घडलं की त्या आनंदाचा तो उत्सव करू लागला आणि हीच पुढे येणाऱ्या सणासुदीच्या दिवसांची नांदी होती. पौराणिक, धार्मिक घटनांमुळे लक्षात राहणाऱ्या उल्लेखनीय घटनांना मांगल्याचं देशीकार लेणं चढवण्यात आलं आणि पाहता पाहता, सण व संस्कृती समाजमनाचा अविभाज्य घटक बनली. पुढे कालगणना आली तसं उत्सवांचं स्वरूप व काळ निश्चित करण्यात आला. त्यातूनच हिंदू धर्मियांची शक, संवत्सरादी कालमापन पद्धती अस्तित्वात आली आणि त्यातूनच पुढे नववर्षाचे सूतोवाच करणारा चैत्र हा प्रथम मास आणि शुद्ध प्रतिपदा हा नववर्षारंभ दिवस या रूपाने अस्तित्वात आला. या कालगणनेला पुराणकालीन, रामायणकालीन घटनांचे संदर्भ लाभले आणि सण, मुहूर्त यातून उत्सव पद्धती अस्तित्वात येत चिरंतन दृढ झाली. धर्मशास्त्रानुसार, चैत्र शुद्ध प्रतिपदा हा शालिवाहन शक या वर्षारंभाचा पहिला दिवस असल्याने या दिवशी स्त्री-पुरुषांनी पहाटे नित्यनेमाची कामं आटोपावी, स्त्रियांनी घरासमोरचं अंगण गाईच्या शेणाने सारवून त्यावर उत्तम प्रकारची रांगोळी घालावी. प्रवेशद्वारासमोर आंब्याच्या पानांची तोरणं बांधावी. घरातल्या सर्व लहानथोर मंडळींनी अंगाला सुवासिक तेल लावून स्नान करून नवीन कपडे घालावेत. उत्तम प्रकारच्या फुलांनी आरास रचून देवांची पूजा करावी. घरातल्या कर्त्या माणसाने वेळूची (बांबूची) मोठी काठी आणून त्यास धुऊन-पुसून, तिच्या टोकाकडच्या बाजूला तांबडं वस्त्र व फुलांची माळ बांधून वर लोटी ठेवावी. अशा रीतीने तयार केलेली वेळूची काठी दारासमोर रांगोळी घातलेल्या जागेवर उभी करून तिची पूजा करावी असं सांगितलं आहे. या वेळूच्या काठीला सर्वसामान्य जन ङ्गगुढीफ असं म्हणतात, तर धर्मशास्त्रात त्याला ङ्गब्रह्मध्वजफ म्हणून ओळखलं जातं. गुढीची पूजा केल्यानंतर कडुनिंबाची कोवळी पानं वाटून त्यात मिरी, हरभऱ्याची डाळ, ओवा, मीठ हे पदार्थ घालून तयार होणारं मिश्रण सर्व लहानथोर मंडळींना खाण्याकरिता दिलं जातं. कडुनिंबाच्या सेवनाने शरीर तेजस्वी व निरोगी राहते. पूर्वकाळी ऋषीमुनी कडुनिंबाची पानं खाऊन राहत असत, असं पुराणात लिहिलेलं आढळतं. सद्य परिस्थितीमध्ये मात्र वर्षप्रतिपदेलाच कडुनिंबाच्या पानांचे सेवन केलं जातं. यानंतरचं सर्वात महत्त्वाचं कार्य म्हणजे येणाऱ्या वर्षातल्या घटनांचं सूतोवाच करणाऱ्या नव्याकोऱ्या पंचांगाचं पूजन तसंच या पंचांगामध्ये वर्णन करण्यात आलेल्या वर्षफलाचे भटजींकडून करवून घेतलेलं वाचन अर्थात पंचागश्रवण. पूर्वी, वर्षफल वाचून झालं की पाऊस, धान्य, समृद्धी, आय-व्यय, संक्रांत, राश्याधिपतीचं फल या विषयावर गावातली जाणकार मंडळी तसंच विद्वान खल अर्थात चर्चा करत. गुढीपाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. यादिवशी आरोग्य प्रतिपद्व्रत (आरोग्यप्राप्तीसाठी), विद्याव्रत (विद्यालाभ होण्यासाठी) व तिलकव्रत (ऐश्वर्यप्राप्तीसाठी) करावं असे शास्त्रपुराणांत सांगितलं आहे. मात्र कालौघात या चालीरीती व व्रतं लोप पावली आहेत. आजकाल या दिवशी कसलंही व्रत न करता उत्सवाचा उत्साह या रूपाने प्रत्येक घरांतून गोडधोडाचे पदार्थ करण्यात येतात. मंगलस्नानादी विधी, गुढीपूजन, पंचागश्रवण आदी कार्यक्रम आटोपले की कुटुंबवत्सल मंडळी देवदर्शनासाठी मंदिरात जात. या दिवशी घरातील कर्त्या मंडळींकडून स्त्रिया व मुलांना नवी वस्त्रं दिली जात असत. काही ठिकाणी पंचांग श्रवणानंतर निमंत्रित मंडळींना अत्तर, गुलाब, पानसुपारी, मिष्टान्न देण्याचा प्रघात होता. काही सुखवस्तू मंडळींकडे गायनादी कार्यक्रम आयोजले जात तर काही ठिकाणी गरीब, उपेक्षित मंडळींना शिधा व भोजन दिलं जात असे. चैत्र शुद्ध प्रतिपदेला शालिवाहन शकाचा प्रारंभ झाल्याचं मानण्यात येतं. या दिवशी शक या परकीय शत्रूवर शालिवाहनांनी विजय मिळवल्यामुळे शालिवाहन शकाची सुरुवात चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून झाली असं विद्वानांचं मत आहे. चैत्र हा हिंदू कालगणनेतला पहिला महिना, पूर्वी ङ्गमधुमासफ म्हणून ओळखला जात असे. मात्र पौर्णिमेच्या सुमारास चंद्र, चित्रा नक्षत्रात असल्याने हा महिना चैत्रमास म्हणून ओळखला जाऊ लागला. गुढीपाडव्यासोबतच प्रतिपदेला वसंतमास, संवत्सर वा चंद्रिका नवरात्र (वासंतिक देवी अर्थात चैत्री नवरात्र) सुरू होतात. चैत्रामध्ये दही, दूध, तूप व मध यांचा त्याग करून विवाहित दाम्पत्याने पूजनात्मक गौरीव्रत करावं असं सांगितलं आहे. चैत्र शु. तृतीयेस ङ्गगौरीतृतीयाफ असे म्हणतात. या दिवशी गौरी माहेरी येते व महिनाभर राहून वैशाख शु. तृतीयेस सासरी परतते असंही मानलं जातं. म्हणून या गौरीच्या आगमनाप्रीत्यर्थ हळदीकुंकू समारंभ आयोजित केले जातात. ते चैत्रातलं हळदीकुंकू म्हणून ओळखलं जातं. कालौघात जगरहाटीचे नियम बदलले, वर्तमानकाळात जगण्याचे संदर्भ बदलले आणि पाहता पाहता सण-संस्कृतीवर आधुनिकीकरणाची झील चढती झाली. असं असलं तरीही गुढीपाडव्यासारख्या सणांची मौज जनमानसामध्ये आजही आपली मोहिनी टिकवून आहे. ज्यांना शक्य नाही ती मंडळी घरात वीतभर उंचीची का होईना परंतु, गुढी उभारतात आणि सणाचा आनंद लुटतात. आज शहरांमधून, मध्यवर्ती चौक तसंच हमरस्त्यावरून शोभायात्रा काढल्या जातात. घराघरांतून पंचपक्कान्नांचा घमघमाट येतो. नवी वस्त्रं परिधान करून घरची व आसपासची मंडळी आनंदसोहळ्याची शोभा वाढवतात आणि नववर्षाचं उत्साहाने स्वागत करतात. आपणही शुभशकुनाची चाहूल घेऊन येणारा चैत्र पाडवा उत्साहाने साजरा करू या. नववर्षाचे स्वागत करू या.

# तीच चव तोच दर्जा नव्याने पुन्हा एकदा आपल्या सेवेत होणार सुरू....

# कायस्थ रेस्टॉरंट हॉटेलचे उद्या होणार शानदार उद्घाटन...

**जनसंचलन/बुलढाणा**

खवय्यांसाठी एक आनंदाची बातमी! बुलढाणा शहरात उद्या, बुधवार, ६ ऑगस्ट रोजी एका नवीन कौटुंबिक रेस्टॉरंटचे, कायस्थ रेस्टॉरंट हॉटेलचे शानदार थाटामाटा उद्घाटन होणार आहे. हे रेस्टॉरंट आपल्या कुटुंबासोबत स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेण्यासाठी एक उत्तम ठिकाण ठरणार आहे. हे रेस्टॉरंट विशेषतः कौटुंबिक वातावरणासाठी डिझाइन करण्यात आले आहे. येथे वेगवेगळ्या प्रकारच्या पदार्थांची चव घेण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध आहेत. यात पारंपरिक महाराष्ट्रीयन पदार्थांपासून ते उत्तर भारतीय आणि चायनीज पदार्थांपर्यंत सर्व काही मिळणार आहे. कायस्थ रेस्टॉरंट हॉटेलचे वैशिष्ट्य म्हणजे येथील ताजे आणि उच्च दर्जाचे पदार्थ, जे अनुभवी शेफ्सच्या देखरेखीखाली तयार केले जातात. रेस्टॉरंटच्या मालक श्री राजेंद्र देवचंद कायस्थ यांनी सांगितले, की ङ्गङ्घ बुलढाणा येथील तसेच जिल्ह्यातील लोकांना एक उत्तम जेवणाचा अनुभव मिळावा, ही आमची इच्छा आहे. आमच्या रेस्टॉरंटमध्ये कुटुंबासोबत आनंदाचे क्षण घालवता येतील, याची आम्ही खात्री देतो. स्पेशल व्हेज थाळी, डाळ बाटी थाळी, स्पेशल मिरची भाजी, स्पेशल पुरणपोळी, स्पेशल चायनीज फूड, स्पेशल काळा मसाला भाजी अशा विविध प्रकारचे जेवण या हॉटेलमध्ये मिळणार आहे. त्यामुळे आता आपला आनंदमय क्षण घालवण्यासाठी एकमेव पर्याय म्हणजेच कायस्थ रेस्टॉरंट हॉटेल आहे.

सुप्रसिद्ध साधूबा यांची जुनी हॉटेल जय श्रीराम बुलढाणा अर्बन समोर शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स पहिला मजला कारंजा चौक येथे असलेली आता कायस्थ रेस्टॉरंट हॉटेल या नावाने ओळखल्याजाणारआहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाराष्ट्राच्या राजकारणात आरोपांचा नवा बॉम्ब

# अविनाश जाधव यांचा मंगलप्रभात लोढा यांच्याबाबत खळबळजनक दावा

**ठाणे :** मनसे नेते अविनाश जाधव यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आरोपांचा नवा बॉम्ब टाकला आहे. त्यांनी राज्याचे कौशल्यविकास तथा रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांचं थेट नाव घेत खळबळजनक आरोप केले आहेत. अविनाश जाधव यांनी आज ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याबाबत तक्रार करत चौकशीची मागणी केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीनंतर अविनाश जाधव यांनी पत्रकार परिषद घेत भूमिका मांडली. यावेळी त्यांनी खळबळजनक दावा केला. ठाणे जिल्ह्याच्या नुकत्याच निवृत्त झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांकडून शेवटच्या दिवशी मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रिपदाचा गैरवापर करुन दबाव टाकून काही फाईल्सवर सह्या करुन घेतल्याचा आरोप अविनाश जाधव यांनी केला आहे. विशेष म्हणजे यासाठी मंगलप्रभात लोढा जिल्हाधिकाऱ्यांच्या घरी देखील गेले होते, असा आरोप अविनाश जाधव यांनी केला.



ङ्कङ्कमी आज ठाण्याच्या नवनिर्वाचित जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. ठाण्यात एक गोष्ट घडली आहे. ते मी त्यांच्या समोर आणली आहे. १ ऑगस्टला आपले आधीचे जिल्हाधिकारी निवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीच्या शेवटच्या दिवसात म्हणजे २५ जुलै ते ३१ जुलै या काळात अचानक खूप फाईली मंजूर करण्यात आल्या आहेत. ज्या फाईल अनेक दिवसांपासून मंजूर होत नव्हत्या, त्या अचानक मंजूर करण्यात आल्या आहेत. मला पडलेला प्रश्न होता की, कित्येक महिने एका जागेवर पडलेल्या फाईल अचानक जिल्हाधिकारी बदलताना कशा समोर आल्या आणि मंजूर करण्यात आल्या?ङ्कङ्क, असा सवाल अविनाश जाधव यांनी केला.लोढा डेव्हलोपर्सकडून काही गोष्टी करण्यात आल्या आहेत. मंगलप्रभात लोढा हे मंत्री आहेत. त्यांनीदेखील त्यांच्या अनेक फाईल जिल्हाधिकाऱ्यांच्या घरी जावून मंजूर केल्या आहेत अशी माहिती आमच्याकडे आली आहे. खरंतर प्रोटोकॉलप्रमाणे मंत्री महोदयांनी जिल्हाधिकाऱ्यांना बोलावून कामे केली पाहिजेत. ते कशाला त्यांच्या घरी जातात? लोढांच्या ३१ तारखेला दोन फायली मंजूर झाल्या आहेत. आधी का नाही झाल्या? अचानक शेवटच्या दिवशी या फायली मंजूर का होतात? सगळीकडेच होतात. पण इथे प्रमाण खूप वाढलं आहेङ्कङ्क, असा दावा अविनाश जाधव यांनी केला.आमची मागणी आहे की, २५ ते ३१ जुलै दरम्यान जेवढ्या फाईल मंजूर झाल्या आहेत त्या राजकीय दबाव्याने मंजूर झाल्या आहेत, त्यामुळे जेवढ्या फायली मंजूर झाल्या आहेत त्यांची सर्वांची चौकशी व्हावी. नव्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्या सर्व फायलींची चौकशी करावी. कशाप्रकारे त्या मंजूर झाल्या, त्यात अनियमितता झाली नाही ना? याबाबत तपासावे. ठाणे शहराला झळ बसत नाही. पण ग्रामीण भागातील अनेक अटकलेल्या संपत्तीचे प्रकरण अचानक सोडवले गेले आहेत. सगळ्या फाईल परत बोलवावेत. कारण जिल्हाधिकारी शेवटच्या दिवशी फक्त सह्या करत होते. ते कोणाच्या दबावाखाली सह्या करत होते?ङ्कङ्क, असा सवाल अविनाश जाधव यांनी केला.आमची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नव्या जिल्हाधिकाऱ्यांना आमची विनंती आहे की, या सर्व फायलींची चौकशी व्हावी. मंगलप्रभात लोढा जिल्हाधिकाऱ्यांच्या घरी कशासाठी गेले होते? ते तपासलं जावं. ३० तारखेला पैसे भरण्यात आले. त्यासाठीच मंगलप्रभात लोढा तिथे गेले होते. याचा अर्थ मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रिपदाचा गैरवापर केला आहे. मंत्रिपदाचा गैरवापर केला असेल तर त्यांना योग्य ती शिक्षक मिळायला हवीङ्कङ्क, अशी मागणी अविनाश जाधव यांनी केली आहे.

ठाणे जिल्ह्यात आज मंगलप्रभात लोढा हे सर्वात मोठे बांधकाम व्यवसायिक आहेत. मायकोट्रेक ही त्यांची दुसरी कंपनी आहे. त्यांच्या दोन कंपनीच्या माध्यमातून कामे होतात. जर लोढा ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठे कंत्राटदार आहेत, त्यांनी त्यांच्या मंत्रिपदाचा गैरवापर केला का? हा प्रश्न आहे. आमच्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांत त्यांच्या १३ फाईल या वेगवेगळ्या विभागातून मंजूर झाल्या आहेत. त्या १३ फाईल राजकीय दबावामुळे मंजूर झाल्या का? याची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशीदेखील मागणी अविनाश जाधव यांनी केली आहे.

# दोन दिवसांपासून खोलीत शांतता, दरवाजा तोडताच धक्कादायक चित्र; नागपुरात एमबीबीएसच्या विद्यार्थ्याचं टोकाचं पाऊल

**नागपूर :** नागपुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. डॉक्टरकीचं शिक्षण घेणाऱ्या तथा अंतिम वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने आपलं आयुष्य संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. घरातील बाथरूमच्या दरवाजाला शाल बांधून गळफास लावून त्यानं आयुष्य संपवलं. दरवाजा तोडल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. सोनगाव पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत या विद्यार्थ्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. सध्या पोलिसांकडून या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.संकेत दाभाडे असं या विद्यार्थ्याचं नाव आहे. तो एम्स हॉस्पिटलमध्ये शेवटच्या वर्गात शिकत होता. घटनेच्या दिवशी तो आपल्या खोलीत गेला. त्यानंतर खोलीतील शाल घेऊन बाथरूममध्ये गेला. बाथरूमच्या दरवाजाला शाल बांधून त्याने गळफास घेत आत्महत्या केली.

धक्कादायक बाब म्हणजे मागील २ दिवसांपासून त्याच्या खोलीचा दरवाजा बंदच होता. संकेत काही घराबाहेर आलाच नाही, असं शेजाऱ्यांनी सांगितलं. खोलीमध्ये कोणतीही हालचाल नव्हती. कोणताही आवाज येत नव्हता. संकेत दिसला नाही म्हणून इतर विद्यार्थ्यांना संशय आला. त्यांनी या संदर्भातील माहिती वसतिगृहाच्या वार्डनला दिली. वार्डनने संकेतच्या खोलीचा दरवाजा तोडला. तसेच बाथरूमचाही दरवाजा तोडला. दरम्यान, दरवाजा तोडल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. यानंतर वार्डनने सोनेगाव पोलिसांना या घटनेसंदर्भात माहिती दिली. पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच घटनेचा तपास करत मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवला. संकेतने आत्महत्या का केली? याचा तपास




पोलिसांकडून सुरू आहे.

अशीच काहीशी घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये घडली आहे. आईने नवीन मोबाईल घेऊन देण्यास नकार दिल्याने अकरावीत शिक्षण घेणाऱ्या एका १६ वर्षीय विद्यार्थ्याने आईसमोर खवड्या डोंगरावरून उडी घेऊन आत्महत्या केली. ही घटना तिसगाव येथील खवड्या डोंगर येथे घडली. आई समोर मुलाने टोकाचे पाऊल उचलल्यामुळे नागरिकांनी हळहळ व्यक्त केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तणाव वाढताच कलेक्टरांचा काढता पाय; परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांचा गोंधळ...



**परभणी** : समृद्धी महामार्गाला जोडणारा जालना-नांदेड हा महामार्ग काही वर्षांपूर्वी मंजूर करण्यात आला. या महामार्गाला लागणाऱ्या जमिनीची मोजणी देखील झाली. पण मोबदला मात्र देताना सरकार हात आखडता घेत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकरी संतप्त झाले आहेत. शेतकऱ्यांना जमिनीचा चांगला मोबदला हवा आहे. पण सरकार त्यामध्ये प्रचंड कपात करत आहे. त्यामुळे चिडलेल्या शेतकऱ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन प्रचंड गोंधळ घातला. ङ्खइतरांना टेंडर अभावने देता आणि शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने घेता हे चालणार नाहीङ्खङ्ख, असं शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना ठणकावून सांगितलेमोठमोठे उद्योगपती कोट्यावधींचे घोटाळे करतात. त्यांचे काहीच होत नाही. पण आमच्यासारख्या गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी मात्र शुल्लक रक्कम देऊन घेण्याचा प्रयत्न करतात. असे कदापि होणार नाही. आमच्या शेतात पाय ठेवला तर आम्ही त्याला खतम करूङ्खङ्ख, असे म्हणत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना चांगलेच खडेबोल सुनावले.समृद्धी महामार्गाला जोडणारा नांदेड-जालना हा महामार्ग मंजूर करण्यात आल्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी आचल गोयल यांनी ९ जून २०२३ रोजी या जमिनीचे मूल्यांकन निश्चित केले. पण हे मूल्यांकन फारच कमी दराने असल्याने शेतकऱ्यांनी या मूल्यांकनाला विरोध केला. त्यानंतर पुन्हा एकदा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या कार्यकाळात ४ ऑक्टोबर २०२४ रोजी फेरमुल्यांकन करण्यात आले.फेर मूल्यांकनाचे दर आणि त्याचा मोबदला सर्व शेतकऱ्यांना मान्य होता. त्यामुळे शेतकरी समाधानी देखील होते. पण अचानक राज्य सरकारने बैठक घेऊन फेर मूल्यांकनानुसार शेतकऱ्यांना मोबदला देता येणार नसल्याचे जाहीर केले. तर ९ जून २०२३ रोजीच्या मूल्यांकनानुसारच रक्कम शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी प्रचंड संतापले. कारण जून २०२३ च्या मूल्यांकनानुसार एकरी ५ ते ६ लाख रुपये शेतकऱ्यांना मिळत आहेत. सध्या बाजारभावाने जमिनीचा एकरी २० लाख रुपये एकर भाव असताना केवळ ५ ते ६ लाख रुपयांचा मोबदला कसा स्वीकारायचा? असा शेतकऱ्यांना प्रश्न पडला आहे.प्रचंड संतापलेल्या शेतकऱ्यांनी आज थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांची बैठक संपन्न झाली. शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना खडेबोल सुनावले. एकीकडे सरकार उद्योगपती धार्जिन आहे आणि दुसरीकडे मात्र शेतकऱ्यांची प्रचंड पिळवणूक करीत असल्याचे शेतकरी म्हणाले. शेतकरी एवढ्यावरच थांबले नाहीत तर आम्हाला जर योग्य मोबदला नाही मिळाला तर आम्ही आमच्या शेतात सरकारच्या कोणत्याच अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्याला पाय ठेवू देणार नसल्याचे म्हणाले. शेतकऱ्यांनी गदारोळ सुरू केल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाला छावणीचे स्वरूप आले. पोलिसांनी प्रचंड बंदोबस्त देखील वाढवला. पण शेतकऱ्यांनी मात्र आपला तीव्र विरोध कायम ठेवला. जिल्हाधिकाऱ्यांसमोर सरकार विषयी प्रचंड संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केला. चिडलेल्या शेतकऱ्यांना पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीतूनच काढता पाय घेतला.एकीकडे शक्तीपीठ महामार्गाला परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यामध्ये विरोध होत असतानाच आता जालना-नांदेड या समृद्धी महामार्गाला देखील आता विरोध सुरू झाला आहे. फेर मूल्यांकनामध्ये चांगला भाव जमिनीला देऊ असे म्हणणाऱ्या सरकारने पुन्हा एकदा हात आखडता घेत समृद्धी महामार्गात जाणाऱ्या जमीन धारकांच्या तोंडाला पाणी पुसण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

जमिनीला जर योग्य मोबदला मिळत नसेल तर आम्हाला समृद्धी महामार्ग देखील नको, असा शेतकऱ्यांनी प्रवित्र घेतला आहे. त्यामुळे आता शक्तिपीठ महामार्गासोबतच समृद्धी महामार्गाला देखील आता विरोध सुरू झाला आहे. आमचा जीव गेला तरी चालेल. पण आम्हीही कसल्याही प्रकारची जमीन देणार असल्याचे शेतकरी म्हणत आहेत. बळजबरी घेण्याचा प्रयत्न केला तर जो आमच्या जमिनीत प्रवेश करतील त्यांचा आम्ही मुडदा पाडू, असे यावेळी शेतकरी म्हणाले.

# विराट कोहलीसोबतच्या अफेअरच्या चर्चांवर तमन्ना अखेर खरं बोलली! मी त्याला फक्त एका दिवसासाठी...



**मुंबई-** साऊथपासून बॉलिवूडपर्यंत आपल्या सौंदर्य आणि अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री तमन्ना भाटियाचे असंख्य चाहते आहेत. या चाहत्यांना तिच्या व्यावसायिक आयुष्याबरोबरच वैयक्तिक आयुष्यात काय चालू आहे किंवा काय घडलेलं हे जाणून घेण्याची नेहमीच उत्सुकता असते. आता अलिकडेच, एका वेबसाइटला दिलेल्या मुलाखतीत तिने तिच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित अनेक गोष्टी शेअर केल्या. या मुलाखतीत तमन्नाने माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू अब्दुल रझाकशी लग्न केल्याच्या एका अफवेबद्दल सांगितले. तसेच विराट कोहलीसोबतच्या अफेअरच्या चर्चांवरही मौन सोडलं. ललनटॉपला दिलेल्या मुलाखतीत तमन्ना म्हणाली की, मला खूप वाईट वाटतंय कारण मी त्याला फक्त एका दिवसासाठी भेटले होते. त्या शूटनंतर मी विराटला भेटलेच नाहीये. मी त्याच्याशी बोललेही नाही किंवा त्याला भेटलेही नाही.भारतीय स्टार क्रिकेटपटू विराट कोहली शिवाय तमन्ना भाटियाचे नाव पाकिस्तानी माजी क्रिकेटर अब्दुल रझाकशी देखील जोडले गेले होते. अब्दुलसोबतच्या तिने गपचूप लग्न उरकले आहे अशा बातम्याही आल्या होत्या. दोघेही एका ज्वेलरी स्टोअरमध्ये दिसले होते, त्यानंतर या सर्व बातम्यांना उधाण आले. तमन्नाने या बातमीची खिल्ली उडवलीती म्हणाली- मस्करी मस्करीत माझं अब्दुल रझाकसोबतही लग्न झालंय. इंटरनेट ही एक मजेदार जागा आहे. तुम्ही माझे लग्न अब्दुल रझाकशीही केले. यानंतर तमन्नाने कॅमेऱ्याकडे पाहिले आणि म्हणाली- माफ करा अब्दुल रझाक सर. तुम्हाला दोन-तीन मुले आहेत. तुमचे आयुष्य काय आहे हे मला माहित नाही.तमन्ना म्हणाली, अशा अफवांना तोंड देणे कठीण असते. जेव्हा तुमचा त्या व्यक्तीशी काहीही संबंध नसतो आणि तरीही लोक अफवा पसरवतात तेव्हा ते खूप विचित्र असते. पण तुम्ही काहीही करू शकत नाही. तुम्ही काहीही करू शकत नाही हे गोष्टसुद्धा स्वीकारण्यास वेळ लागतो. लोक त्यांना काय हवे ते विचारत राहतील. तुम्ही बसून कोणावरही नियंत्रण ठेवू शकत नाही.

तमन्नाच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाल्यास काही काळापूर्वीच तिचा अभिनेता विजय वर्माशी ब्रेकअप झाला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुंबई पालिका महायुतीच जिंकेल; ठाकरे बंधूंच्या ऐक्यावर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया....

**मुंबई :** दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तरी महायुतीच मुंबई महापालिका निवडणूक जिंकेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी व्यक्त केला. मने तुटलेली असतात तेव्हा युती करणे कठीण असते असे सांगत त्यांनी उद्धव ठाकरे तसेच एकनाथ शिंदे हे दोघे नेते एकत्रित येण्याची शक्यता नाकारली. फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ठाकरे बंधू एकत्र येणार का, या प्रश्नावर फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ठाकरे बंधूंच्या मनात काय आहे ते तेच जाणू शकतात. मला माहिती नाही. परंतु अनेकदा राजकीय असहायता अशी असते की, ती



लोकांना एकत्र आणते. राजकीय असहायतेमुळेच ते दोघे एकत्र आलेले आहेत. ते पुढे काय करतील ते मी सांगू शकत नाही. परंतु मी एवढे सांगू शकतो की, आपल्याकडे हा एपिसोड रेकॉर्डेड असेल. मुंबई महापालिका निवडणुकीनंतर हा एपिसोड दाखवा.ते पुढे म्हणाले की, प्रसारमाध्यमांतील अनेक प्रतिनिधी ठाकरे बंधू एकत्र आले तर असे दाखवतायत जसे काही आम्हीच त्यांना वेगळे केले होते. परंतु आमची त्यात कोणतीही भूमिका नव्हती. त्यांचे आपापसात भांडण होते. उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंना शिवसेनेतून बाहेर काढले होते. आता दोन्ही एकत्र आले तर ते मला त्याचे श्रेय देत आहेत. तर मी ते श्रेय घेऊ इच्छित आहे. मी त्यासाठी खूप आनंदी आहे, असेही ते म्हणाले.यावेळी देवेंद्र फडणवीस यांना उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे एकत्र येतील का, असाही प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी राजकीय युती करणे खूप सोपे असते. परंतु मने तुटलेली असतात तेव्हा युती करणे कठीण असते. इथे मने तुटली आहेत, असे ते म्हणाले.

राज ठाकरे यांनी भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यावर टीका केली आहे. त्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. हेही चुकीचे आहे. ते काय बोलले ते मी पूर्ण पाहिलेले नाही. परंतु ते ज्याप्रकारे बोलले हेदेखील चुकीचे आहे. आम्ही आता कोणत्या दिशेला चाललो आहोत? इतके संकुचित आम्ही कसे होतोय ? आपली संस्कृती काय, आपला इतिहास काय आहे. मराठ्यांनी केवळ महाराष्ट्रासाठी आणि मराठीसाठी लढाई केली नाही. या देशात हिंदवी स्वराज्य स्थापन करणारे मराठे होते. मराठ्यांनी पानिपतची लढाई लढली होती, असेही फडणवीस म्हणाले.

# सैयारा लवकरच ३०० कोटी! १७ दिवस बॉक्स ऑफिसवर अधिराज्य; सन ऑफ सरदार २ आणि धडक २ला तगडी टक्कर...

**मुंबई:** अहान पांडे आणि अनित पड्डा यांच्या सैयारा चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. या चित्रपटाने सन ऑफ सरदार २ आणि धडक २ यांसारख्या नवीन चित्रपटांना टक्कर दिली आहे. सिनेमाने १७ दिवसात २९४.१५ कोटी रुपयांची कमाई केली आहे आणि हा सिनेमा ३०० कोटी क्लबमध्ये एन्ट्री करण्यासाठी सज्ज झाला आहे. २ च्या कमाईबद्दल सांगायचे झाल्यास या सिनेमाने आतापर्यंत १८.७४ कोटी रुपयांचा गल्ला कममावला आहे आणि २ ने ८.७७कोटी रुपये कमावले आहेत.मोहित सुरी दिग्दर्शित सैयारा चित्रपटात अहान पांडे आणि अनित पड्डा यांच्या भूमिका आहेत. सैयारा चित्रपटाने पहिल्या आठवड्यात १७२.७५ कोटी रुपये कमावले, तर दुसऱ्या आठवड्यात हा आकडा १०७.७५ कोटी रुपये झाल. तिसऱ्या आठवड्यातही चित्रपटाच्या कमाईत घट झाली, तरीही इतर चित्रपटांपेक्षा सैयारा आघाडीवर आहे.सैयाराची एकूण कमाई

पहिला दिवस (पहिला शुक्रवार) - २१.५ कोटी रुपये
दुसरा दिवस (पहिला शनिवार) - २६ कोटी रुपये
तिसरा दिवस (पहिला रविवार) - ३५.७५ कोटी रुपये
चौथा दिवस (पहिला सोमवार) - २४ कोटी रुपये
पाचवा दिवस (पहिला मंगळवार) - २५ कोटी रुपये
सहावा दिवस (पहिला बुधवार) - २१.५ कोटी रुपये
सातवा दिवस (पहिला गुरुवार) - १९ कोटी रुपये
पहिल्या आठवड्याचे कलेक्शन - १७२.७५ कोटी रुपये
आठवा दिवस (दुसरा शुक्रवार) - १८ कोटी रुपये
नववा दिवस (दुसरा शनिवार) - २६.५ कोटी रुपये
दहावा दिवस (दुसरा रविवार) - ३० कोटी रुपये
अकरावा दिवस (दुसरा सोमवार) - ९.२५ कोटी रुपये
बारावा दिवस (दुसरा मंगळवार) - १० कोटी रुपये
तेरावा दिवस (दुसरा बुधवार) - ७.५ कोटी रुपये
चौदावा दिवस (दुसरा गुरुवार) - ६.५ कोटी रुपये
दुसऱ्या आठवड्याचे कलेक्शन









- १०७.७५ कोटी रुपये
पंधरावा दिवस (तिसरा शुक्रवार) -४.५कोटी रुपये
सोळावा दिवस (तिसरा शनिवार) -६.७५ कोटी रुपये
सतरावा दिवस (तिसरा रविवार): -२.४ कोटी रुपये (सुरुवातीची आकडेवारी)
एकूण - २९४.१५ कोटी रुपये

तर अजय देवगण आणि मृणाल ठाकुर यांच्या सन ऑफ सरदार २ ने सुरुवातीपासूनच चांगली कमाई केली आहे. शनिवारपर्यंत या चित्रपटाने ८.२५ कोटी रुपयांचे कलेक्शन झाले होते. रीलिजनंतर तिसऱ्या दिवशी जवळपास ३ कोटींचा आकडा (रविवारचे सुरुवातीचे कलेक्शन) गाठला आहे. त्यानंतर एकूण कमाई १८.७४ कोटींवर पोहोचली असून, धडक २ चित्रपटाने शनिवारपर्यंत ३.७५ कोटी रुपये कमावले. रविवारी सुरुवातीच्या सत्रात या चित्रपटाने १.५२ कोटी रुपये कमावले आहेत, त्यानंतर एकूण कमाई ८.७७ कोटी झाली आहे. रविवारी पूर्ण दिवसाचे कलेक्शन समोर आल्यानंतर या आकड्यात बदल होऊ शकतो. दरम्यान ३ ऑगस्ट रोजी सैयारापेक्षा सन ऑफ सरदार २ची कमाई जास्त आहे. असे असले तरीही अजय-मृणालच्या सिनेमाला अहान-अनितच्या सिनेमापर्यंतचा टप्पा गाठण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. कारण, तरुणाईमध्ये असणारी ची क्रेझ अद्यापही कमी झालेली नाही

# आता पक्ष प्रवेशातही घोटाळा? शिंदेंच्या नेत्याने बोगस यादी तयार केल्याचा आरोप; पक्षाच्या कारवाईकडे लक्ष


**अहिल्यानगर :** आर्थिक घोटाळा, जमीन घोटाळा, नोकरभरती घोटाळा असे घोटाळ्याचे एक ना अनेक प्रकार आपण ऐकले असतीलच. पण भामट्यांना मात्र आता चक्क पक्ष प्रवेशामध्ये घोटाळा केल्याचा प्रकार समोर आला आहे. शिंदेंच्या शिवसेनेत समर्थकांसह प्रवेश करताना, अहिल्यानगर जिल्ह्यातील एका नेत्याने बोगस यादी सादर केल्याचा आणि पक्षाची दिशाभूल केल्याचा आरोप होत आहे. एकनाथ शिंदे यांच्या संभाव्य अहिल्यानगर जिल्ह्या दौऱ्याच्या आधीच पक्ष प्रवेश घोटाळ्याच्या आरोपाने राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.



काय आहे प्रकरण जाणून घेऊया. अहिल्यानगरच्या अकोले तालुक्यातील मारुती मेंगाळ हे आदिवासी ठाकर समाजाचे मोठे नेते आहेत. मेंगाळ यांनी तीन महिन्यांपूर्वी आपल्या समर्थकांसह शक्ती प्रदर्शन करत ठाणे येथे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. आपल्या सोबत अकोले तालुक्यातील अनेक ग्रामपंचायचे सरपंच आणि सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते असल्याचा मोठा दावा मारुती मेंगाळ यांनी केला होता.मेंगाळ यांच्यासमवेत पक्षप्रवेश केलेल्या लोकांची यादी समोर आली आहे. यातील अनेक नावे बोगस असल्याचा आरोप आता होत आहे. यादीत नाव असणाऱ्या अनेकांनी आपले व्हिडिओ प्रसारित केले आहेत, ज्यामध्ये त्यांनी दावा केला आहे की, आपण पक्षप्रवेश केलाच नाही. या सगळ्या प्रकारानंतर शिवसेना शिंदे गटाचे शिर्डी लोकसभा संपर्कप्रमुख बाजीराव दराडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, मारुती मेंगाळ यांच्या पक्ष प्रवेशावेळी पक्षाने आम्हाला कल्पना दिली नाही. काही दिवसांपूर्वी पक्ष प्रवेशाची यादी समोर आल्यानंतर अनेकांनी हरकती घेतल्या आहेत. शहानिशा केल्यानंतर यादीतील ४० ते ५० लोकांची नावे बोगस असल्याचे समोर आले आहे. पक्षाची आणि वरिष्ठ नेत्यांची दिशाभूल करण्यात आल्याचे आम्ही नेत्यांना कळवले आहे. या प्रकारामुळे पक्षाची प्रतिमा मलीन होत असून वरिष्ठांनी योग्य तो निर्णय घ्यावा, असे दराडे म्हणाले.

# रितेश देशमुखच्या कॉलेज क्रशचे जेनेलिया डिसूझाने मानलेले आभार

**मुंबई-** हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात लोकप्रिय अभिनेत्री जिनेलिया डिसूझा हिचा आज ३८ वा वाढदिवस आहे. ५ ऑगस्ट १९८७ रोजी मुंबईत जन्मलेली जिनेलिया एका कॅथलिक कुटुंबात वाढली. जिनेलियाने तिच्या कारकिर्दीत अनेक हिंदी, तेलगू आणि तमिळ चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता तर ती मराठीमध्येही प्रेक्षकांची आवडती नायिका झाली आहे. आज तिच्या वाढदिवसाच्या खास दिवशी काही खास गोष्टी जाणून घेऊ.जेनेलिया शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात राज्यस्तरीय एथलिट, स्प्रिंटर आणि राष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल खेळाडू होती. वयाच्या १५ व्या वर्षी तिने मॉडेलिंगमध्ये प्रवेश केला. त्यानंतर २०२३ मध्ये तुझे मेरी कसम या चित्रपटातून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात तिची रितेश देशमुखसोबत दिसली होती. हिंदी, तेलगू, कन्नड आणि तमिळसह अनेक भाषांमधील चित्रपटांमध्ये काम करून या अभिनेत्रीने एक वेगळे स्थान मिळवले.जेनेलिया डिसूझा आणि रितेश देशमुख यांची पहिली भेट २००३ मध्ये तुझे मेरी कसम या चित्रपटाच्या सेटवर झाली होती. त्या




काळात रितेशला पहिल्याच नजरेत जेनेलियाच्या प्रेमात पडलेला पण अभिनेत्रीसोबत उलट झाले तिला रितेश माजुरडा मुलगा वाटलेला. तो मुख्यमंत्र्यांचा मुलगा असल्यामुळे तो आपल्याला माज दाखवेल असा समज तिचा झालेला. त्यामुळे तिने आधीच त्याला एटिट्यूड दाखवायला सुरुवात केली. पण नंतर चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान दोघेही भेटले, काम केले आणि प्रेमात पडले. जेनेलिया १६ वर्षांची होती आणि रितेश २४ वर्षांचा होता. दोघांनी १० वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर २०१२ मध्ये लग्न केले. आता त्यांना दोन मुले आहेत.जेनेलिया देशमुख रितेश देशमुख यांनी एकमेकांसोबत बरेच काम केले. आता तर ते मराठीत उत्तम कलाकृती सादर करतात. त्यांचा वेड सिनेमा प्रचंड गाजला. याच सिनेमाच्या एका मुलाखतीत रितेशने त्याच्या कॉलेजमधल्या प्रेमचा उल्लेख केलेला. तो म्हणालेला- मी कॉलेजमध्ये असताना एक मुलगी मला आवडायची पण तिला मी कधी सांगू शकलो काही तू मला आवडतेस असं, रितेश हे बोलताना जेनेलियापण तिच्या शेजारी बसलेली. त्याचं बोलणं ऐकत होती. रितेशने त्याच्या कॉलेजमधल्या प्रेमाबद्दल सांगितल्यावर ओघाओघात ती म्हणाली, बरं झालं.... ह्याने तिला सांगितलं नाही. जेनेलियाच्या या बोलण्यावर तिथे उपस्थितांचा हशा पिकला.जेनेलियाच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास नुकताच तिचा सितारे जमीन पर हा सिनेमा रिलीज झाला. त्यात ती आमिर खानसोबत दिसली. हा सिनेमा प्रेक्षक आणि समिक्षकांना खूप आवडला.

# दुचाकी उभी केली, काही वेळ थांबला अन् होमगार्डची उड्डाणपुलावरुन उडी



**नागपूर :** शहरातील मानकापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या क्रीडा संकुलासमोर सोमवारी दुपारी एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. यशवंत रमेश शाहू (वय अंदाजे ३०), असं या मृत व्यक्तीचा नाव असून त्यांनी मानकापूर उड्डाणपुलावरून उडी मारून आपलं आयुष्य संपवलं केली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडवून दिली.प्रत्यक्षदर्शीच्या माहितीनुसार, यशवंत शाहू यांनी आपली दुचाकी उड्डाणपुलावर उभी केली आणि काही वेळ तिथेच उभा राहिले. त्यानंतर अचानक त्यांनी अचानक उड्डाणपुलावरून उडी घेतली. पुलावरून खाली पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी तात्काळ पोलिसांना व रुग्णवाहिकेला माहिती दिली.

लगेचच त्याला गंभीर अवस्थेत मेयो रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.मृतक यशवंत शाहू हे जरीपटका परिसरातील कुकरेजा नगरमध्ये राहत होता. तो नागपूर होमगार्ड विभागात कार्यरत होता तसेच मेस्को या खासगी संस्थेमध्ये सुरक्षा रक्षक म्हणूनही काम करत होते. त्यांची कोणतीही आत्महत्येपूर्व चिठ्ठी मिळालेली नाही. त्यामुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत अद्याप काहीही माहिती समोर आलेली नाही. घटनेची माहिती मिळताच मानकापूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, या घटनेचा तपास सुरु करण्यात आला आहे. पोलिसांनी उड्डाणपुलासह परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे, जेणेकरून यशवंत शाहू यांच्या हालचालींबाबत अधिक माहिती मिळू शकेल.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सद्भावना सेवा समिती बुलढाणा आयोजित भव्य संगीतमय शिवपुरण कथेंचे - पुष्प पहिले



जनसंचलन/बुलडाणा

हिंदु धर्मात श्रावण महिना अत्यंत महत्वाचा मानला जातो. पार्वतीने याच महिन्यात शिवाला प्रसन्न करुन घेतले. पार्वतीने तप केले या महिन्यात शिवमहापूरण कथा श्रवण करण्याचे महत्व आहे. शिवमहापुराण कथेचे महात्म्य सांगताना दिपशरणजी महाराज म्हणाले की, श्रध्दा व विश्वास असेल तर भक्ती निर्माण होते. मनुष्य जन्म भाग्याने मिळतो व शिवकथा ऐकणे परमसौभाग्याचे आहे.

सद्भावना सेवा समिती द्वारा आयोजित सात दिवसीय शिवमहापूराण कथेमध्ये ते बोलत होते. कथा सुरु होण्यापुर्वी बारा ज्योतीलिंगाचे पुजन व रुद्राभिषेक करण्यात आला. यामध्ये प्रमुख यजमान सौ. निलीमा जयशंकर जैस्वाल, सौ. दिपीका, सागर लक्ष्मीकांत जैस्वाल, सौ. नंदिनी, नितीन जैस्वाल, सौ. प्रतिक्षा गणेश सोनवणे, सौ. कविता, सुरेश नंदलाल जैस्वाल, सौ. कुशी ,अभिजीत जयप्रकाश जैस्वाल, सौ. रेखा प्रकाशचंद्र पाठक, सौ. सितादेवी चंपालाल शर्मा, गिरीधारी शर्मा यांनी रुद्राभिषेक करून पुजन केले. आजच्या दिवसाची जबाबदारी जैस्वाल समाज महिला मंडळाकडे होती. जांगीड समाजाने प्रसाद वितरण केले. बाल संत दिपशरणजी महाराज यांनी विठ्ठल माझा माझा मी विठ्ठलाचा हे मराठी भजन म्हटले तेव्हा मंडपातील सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले. महाराजांनी बुलडाणा शहरातील महिला श्रोता वर्ग खुप चांगला आहे व आदर्श आहे असे प्रशंसोउद्गार काढले. जैस्वाल समाज महिला मंडळाच्या सौ. सुवर्णाज्योती जैस्वाल,, श्रीमती रत्ना जैस्वाल, श्रीमती उषा जैस्वाल, श्रीमती प्रेमलता जैस्वाल सौ. अनिता जैस्वाल, सौ. शिल्पा जैस्वाल यांनी रुद्राभिषेक, आरती, पार्थिव शिवलिंग तयार करणे इत्यादीमध्ये सहभाग घेतला सद्भावना सेवा समिती द्वारा आयोजित शिवमहापुराण कथेमध्ये पहिल्याच दिवशी महिलांचा प्रचंड उत्साह दिसुन आला. बाल संत दिपशरणजी महाराजांच्या प्रत्येक भजनावर महिला प्रतिसाद देत होत्या असे उद्गार समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी यांनी काढले. यावेळी मराठी भजनाचा आनंद सर्वानी मनापासुन घेतला.

# हायवे क्रमांक ५३ शेजारील शेतामधील विहिरीमध्ये आढळला मृतदेह

जनसंचलन/मलकापूर



खामगाव एमआयडीसीच्या परिसरातून २ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता बेपत्ता झालेल्या ४८ वर्षीय घनश्याम रमेशचंद्र भुतडा यांचा मृतदेह अखेर पाच ऑगस्ट रोजी विटाळी धानोरा शेतशिवाराजवळ असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ लगतच्या एका शेतातील विहिरीत आज सकाळी घनश्याम यांचा मृतदेह आढळून आला. या इसमाचे हात-पाय बांधलेल्या अवस्थेत सकाळी शेतात कामासाठी गेलेल्या शेतमजुरांना ही घटना दिसून आली. त्यांनी तात्काळ मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात याबाबत माहिती दिली. घटनेची गंभीरता लक्षात घेता पोलीस अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, पंचनामा सुरू आहे. यासोबतच फॉरेन्सिक टीमलाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले आहे . मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय मलकापूर या ठिकाणी पाठवण्यात आले, घटनेमागचे खरे कारण शोधण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास मलकापूर ग्रामीण पोलीसकरीतआहेत.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# डॉ वसंतरावजी संबारे सायकल बचत बँकेच्या माध्यमातून ग्रामीण विकास विद्यालयाच्या शेकडो विद्यार्थ्यांना सायकल वितरणाचा संकल्प आज पूर्ण

**जनसंचलन/मलकापुर**



अनेकांच्या सहकार्यातून व संकल्पनेतून लावण्यात येत असलेलं सायकल बचत बँक या नावाच रोपट अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मार्गात वटवृक्षाच्या सावली सारखं काम करेल ही आशा प्रज्वलित करून आज ग्रामीण विकास विद्यालय बेलाड या शिक्षण संस्थेने बेलाड मध्ये बाहेर गावा वरून येणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता, शिक्षण महर्षी स्व.डॉ वसंतरावजी संबारे सायकल बचत बँक ही संकल्पना पूर्णत्वास आणून गावाबाहेरील शेकडो विद्यार्थ्यांना सायकल वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी श्री एस पी बोरगावकर साहेब ( एम डी चैतन्य बायोलॉजिकल्स प्रा.लि ) यांच्या हातून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले श्री एन जे फाळके तर ( गटशिक्षणाधिकारी ) कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तथा कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री गणेश गिरी साहेब, इंजि.सचिन तायडे साहेब, श्री नारायणदास निहलानी, श्री एडवोकेट प्रवीण भोळे, डॉ.नितीन बऱ्हाटे, श्री एन बी शिंदे, श्री अरुण संबारे, श्री विश्वासराव संबारे यांच्या सह शिक्षक वर्ग, सेकडो पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा तर वनविभागांतर्गत वनगुन्हा दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

मोताळा तालुक्यातील माळेगावमधील वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच वनविभागांतर्गत सुध्दा वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही नियमानुसार व कायद्याचे पालन करुन करण्यात आली आहे, अशी माहिती उपवनसंरक्षक सरोज गवस यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. दि. २३ जुलै २०२५ रोजी मोताळा वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे मोहेगाव, राजुर वनपरिमंडळ, पूर्व खैरखेड बिटअंतर्गत वनखंड क्र.३२३ मध्ये अवैधरित्या केलेल्या झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यासाठी वनविभागाचे अधिकारी कर्मचारी, पोलीस अधिकारी कर्मचारी व महसूल अधिकारी, राज्य राखीव पोलीस तुकडी यांचेसह गेल्यावर झोपड्या व पाल काढत असतांना अचानकपणे १०० ते १५० लोकांच्या समुहाने येऊन कर्मचा-यावर दगडफेक, डोळ्यात मिरची पावडर फेकली व काठ्या, कोयता, कुऱ्हाडी याने प्राणघातक हल्ला केला होता. हा हल्ला केल्यावर त्या ठिकाणावरुन कर्मचारी वाहनात बसून बाहेर येत असतांना त्या वाहनांना घेरुन वाहनांवर हल्ला केला होता. यामध्ये वाहनांवर दगडफेक केल्याने वाहनांच्या काचा फुटल्या व त्यातील कर्मचारी गंभीर जखमी झाले होते. अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी आणलेल्या जेसीबीची तोडफोड केली होती. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) मेहकर यांचे बोलेरो वाहनाची संपुर्ण तोडफोड करुन जाळुन देण्याचा प्रयत्न केला व इतर वाहने सुध्दा फोडण्यात आले. या हल्ल्यामध्ये वनविभागाचे ५ कर्मचारी (दोन महिला व तीन (पुरुष), पोलीस विभागाचे ८ कर्मचारी (६ महिला व २ पुरुष) व राज्य राखीव पोलीस दल तुकडी मधील १ जवान (पुरुष) हे गंभीररित्या जखमी झाले असुन या कर्मचाऱ्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. या वनजमीनीवरील अतिक्रमणधारकांनी शेतीसाठी वनहक्क दावे दाखल केले होते. तथापि, घरासाठी दावे दाखल नव्हते. या शेतीच्या दाव्याबाबतचे जिल्हा वनहक्क समितीने सन २०२२ मध्ये वनहक्क दावे नामंजूर करण्यात आले होते. यानंतर दावेधारकांनी या दाव्यावर पुनर्विलोकन अर्ज केला व पुरावे सादर करण्यासाठी वेळ मागितला होता. यानुसार दाव्यावर जिल्हा वनहक्क समिती मार्फत पुनर्विलोकन करण्यात आले व यामध्ये सन २०२४ मध्ये सदर दावे पुन्हा नामंजूर करण्यात आले. यानंतर वन विभागामार्फत अतिक्रमण काढण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५३, ५४ अन्वये कार्यवाही करण्यात आली. यानुसार सहाय्यक वनसंरक्षक (प्रा व कॅम्पा) बुलढाणा यांनी माहे जानेवारी २०२५ ते फ ब्रुवारी-२०२५ कालावधीमध्ये अतिक्रमणधारकांना जमिनीवरचे सर्व पुरावेसह कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत पत्राने कळविले होते. यानुसार या कालावधीत वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) मोताळा व गैरअर्जदार अतिक्रमणधारक यांच्यात सुनावणी घेण्यात आली. अतिक्रमणधारकांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले पुरावे यांचा विचार करून सहाय्यक वनसंरक्षक यांनी सदर क्षेत्राबाबत अतिक्रमण निष्कसनाचे आदेश जारी करण्यात आले. अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करण्याअगोदर सदर क्षेत्र खाली/रिकामे करण्याबाबत व निघून जाण्याबाबत १५ दिवस अगोदर संबंधित अतिक्रमणधारकांना वैयक्तिकरित्या नोटीसद्वारे कळविण्यात आले होते.

# पी एम सन्मान योजना ही शेतकऱ्यांप्रति केंद्र सरकारची असलेली बांधिलकी केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे त्याला आर्थिक हातभार देण्याच्या दृष्टिकोनातून करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान सन्मान योजना सुरू केली ही केंद्र सरकारची शेतकरी प्रति असलेली बांधिलकी असल्याचे प्रतिपादन केद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांना व्यक्त केले पी एम किसान सन्मान निधीचा विसावा हप्ता आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरित करण्यात आला त्यानिमित्य वाराणसी येथे मुख्य कार्यक्रम संपन्न झाला तर बुलढाणा येथील कृषी विज्ञान केंद्र येथे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थित एक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव बोलत होते यावेळी व्यासपिठावर कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ झापे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री मनोज ढगे, प्रकल्प संचालक आत्मा श्री पुरुषोत्तम उन्हाळे युवासेना नेते कुणल गायकवाड उपस्थित होते केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करता यावे . वेळेवर त्यांना पैसा उपलब्ध व्हावे या दृष्टिकोनातून पी एम किसान सन्मान योजना शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारच्या वतीने सुरू करण्यात आली आहे ही योजना देशातील अन्नदात्याच्या कष्टाचा हा सन्मान करणारी आहे पी एम किसान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गरजेच्या वेळी आर्थिक मदत होते शेतीमध्ये लागणारे बी बियाणासाठी या रकमेचा उपयोग होतो ही शेतकऱ्यांसाठी लाभदायी योजना असल्याचे ही त्यांनी सांगितलं याशिवाय केंद्र सरकारच्या वतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविते त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेऊन आपली आर्थिक उन्नती करावी अस आवाहन केद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले या कार्यक्रमाला शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेगाव बसस्थानकालगत बंद दुकानाला आग

**जनसंचलन/ शेगाव**




शहरातील बसस्थानक परिसरात सोमवार, ४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास एका बंद दुकानाला अचानक आग लागली. दुपारी नेहमीप्रमाणे बसस्थानक परिसरात वर्दळ असताना अचानक एका बंद दुकानातून धूर येताना दिसल्याने नागरिकांनी तत्काळ याची माहिती प्रशासनाला दिली. वाहतूक नियंत्रक महेश पाटील आणि बसस्थानक व्यवस्थापिका शुभांगी पवार यांनी घटनास्थळी येत परिस्थितीचा आढावा घेतला आणि तातडीने अग्निशमन विभागाशी संपर्क साधला. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी सायबर कॅफे महा ई सेवा केंद्र होत दाखल आगीवर नियंत्रण मिळवले. काही वेळातच आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र दुकानाचे आंतरिक नुकसान झाले असून, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले की, या घटनेचा पंचनामा करण्यात आला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८